महाराष्ट्र वन विभाग

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

"वनभवन", रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१

## जाहिर सुचना

दिनांक २२/११/२०२३

## वन विभागातील भरती प्रक्रियेचा कालबध्द कार्यक्रम

- वनविभागातील खालील पदांची भरती प्रक्रिया सुरु असून त्याकरीता दिनांक ८/६/२०२३ रोजी जाहिरात देण्यात आली होती.

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १३ |
| २ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | २३ |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ८ |
| ४ | वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक | ५ |
| ५ | कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक | १५ |
| ६ | लेखापाल (गट-क) | १२९ |
| ७ | सर्व्हेक्षक (गट-क) | ८६ |
| ८ | वनरक्षक (गट-क) | २१३८ |
| | **एकूण** | **२४१७** |

- सदर पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने (Computer Based Test) परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात दिनांक ३१/७/२०२३ ते ११/८/२०२३ या कालावधीत घेण्यात आली.
- मा. राज्यपाल यांचे अधिसूचना दिनांक २९/८/२०१९ अन्वये पेसा क्षेत्रातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीसाठी अधिसूचीत करण्यात आली आहेत. तथापी सदर अधिसूचनेला मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून या प्रकरणी पुढील कार्यवाही न करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या सुचना आहेत. त्यामुळे वनरक्षक पदाच्या परीक्षेचा निकाल जाहिर करता येत नाही.
- लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) या राज्यस्तरीय पदांचा व लेखापाल (गट-क) व सर्वेक्षक (गट-क) या प्रादेशिक पदांचा निकाल दिनांक २२/११/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

• भरती प्रक्रियेबाबत पदनिहाय पुढील टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

## राज्यस्तरीय पदे :-

**(१) लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित) :-**

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | ४५% पेक्षा जास्त गुण असलेल्या उमेदवारांची कागदपत्र तपासणी व व्यावसायिक चाचणी घेणे | ३१/१२/२०२३ |
| २ | लेखी परीक्षेचे गुण व व्यावसाचिक परीक्षेचे गुण एकत्रित करुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | १५/१/२०२४ |
| ३ | अंतिम निवडसूची प्रसिध्द करणे | ३०/१/२०२४ |
| ४ | नियुक्ती आदेश देणे | २८/२/२०२४ |

**(२) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क), कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) :-**

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | ४५% पेक्षा जास्त गुण असलेल्या उमेदवारांची कागदपत्र तपासणी करणे | ३१/१२/२०२३ |
| २ | अंतिम निवडसूची प्रसिध्द करणे | ३०/१/२०२४ |
| ३ | नियुक्ती आदेश देणे | २८/२/२०२४ |

## प्रादेशिक स्तरीय पदे :-

**(१) लेखापाल (गट-क):-**

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | ४५% पेक्षा जास्त गुण असलेल्या उमेदवारांची कागदपत्र तपासणी करणे | ३१/१२/२०२३ |
| २ | अंतिम निवडसूची प्रसिध्द करणे | ३०/१/२०२४ |
| ३ | नियुक्ती आदेश देणे | २८/२/२०२४ |

**(२) सर्व्हेक्षक (गट-क) :-**

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | ४५% पेक्षा जास्त गुण असलेल्या उमेदवारांची कागदपत्र तपासणी व व्यावसायिक चाचणी घेणे | ३१/१२/२०२३ |
| २ | लेखी परीक्षेचे गुण व व्यावसाचिक परीक्षेचे गुण एकत्रित करुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | १५/१/२०२४ |
| ३ | अंतिम निवडसूची प्रसिध्द करणे | ३०/१/२०२४ |
| ४ | नियुक्ती आदेश देणे | २८/२/२०२४ |

(रिन्नी सिंह)
उपवनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन),
नागपूर